**सापळा केस** दिनांक २५/०३/२०२१

**आलोसे क्रं १) माधुरी महादेवराव मुंढे वय ३२ वर्षे व्यवसाय सहायक पोलीस निरीक्षक,**
**आलोसे क. २) संजय त्र्यंबक भेंडेकर वय ५३ वर्षे व्यवसाय पोलीस हवालदार ब.नं २१४,**
**आलोसे क. ३) प्रेमदास दयाराम पवार वय ३७ वर्षे व्यवसाय पोलीस शिपाई ब.नं ५६७ सर्व नेमणुक शासकीय रेल्वे पोलीस स्टेशन परळी वैजनाथ यांनी १,००,०००/— रू लाच मागणी व स्विकारलेची यशस्वी सापळा कारवाई**

यातील तक्रारदार यांनी ला.प्र.वि.कार्यालय परभणी येथे दि.१८/०३/२०२१रोजी तक्रार दिली की, तक्रारदार यांना त्यांचे विरूध्द असलेल्या अर्जामध्ये ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल होवु न देण्यासाठी व तक्रारदार यांची गंगाखेड रेल्वे स्टेशनवरील कॅन्टीन चालु देण्यासाठी यातील आलोसे क्रं ०१ व ०२ हे १,००,०००/— रूपये लाचेची मागणी करीत असुन त्यावर तक्रारदार यांनी माझेकडे एवढे पैसे नाही असे म्हणले असता आलोसे क्रं ०२ यांनी तक्रारदार यांना १,००,०००/— रूपये द्यावेच लागतील असे म्हणुन लाचेची मागणी करीत आहेत. त्यांच्या विरूध्द कारवाई करावी वगैरे मजकुराची तक्रार दिली होती.

त्यानुसार लाप्रवि परभणी कडुन दि.१८.०३.२०२१ रोजी रेल्वे स्टेशन गंगाखेडचे पार्कींग परिसरामध्ये करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाहीमध्ये आलोसे क्रं ०२ भेंडेकर यांनी तक्रारदार यांना पंचासमक्ष १,००,०००/— रूपये लाचेची मागणी केली व दिनांक २०.०३.२०२१ रोजी शासकीय रेल्वे पोलीस चौकी परळी वैजनाथ येथे करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाहीमध्ये आलोसे क्रं ०१ माधुरी मुंढे व आलोसे क्रं ०२ भेंडेकर यांनी तक्रारदार यांना पंचासमक्ष १,००,०००/— रूपये लाचेची मागणी करून आलोसे क्रं ०३ यांनी तक्रारदार यांना सदर लाचेची रक्कम आलोसे क्रं ०१ व ०२ यांना देण्याकरीता प्रोत्साहन दिले. त्यावरून वर नमुद आलोसे यांनी तक्रारदार यांना त्यांचे विरूध्द असलेल्या अर्जामध्ये ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल होवु न देण्यासाठी व तक्रारदार यांची गंगाखेड रेल्वे स्टेशनवरील कॅन्टीन चालु देण्यासाठी १,००,०००/—रूपये लाच मागीतल्याचे निष्पन्न झालेवरून दि.२५.०३.२०२१ रोजी करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे क्रं ०१ , ०२ व ०३यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम तक्रारदार यांचेकडुन आलोसे क्रं ०२ भेंडेकर यांनी पंचासमक्ष स्विकारून आलोसे भेंडेकर हे लाचेच्या रक्कमेसह पळुन गेले. त्यावरून आरोपी लोकसेवक क्रं १) माधुरी महादेवराव मुंढे वय ३२ वर्षे व्यवसाय सहायक पोलीस निरीक्षक, नेमणुक शासकीय रेल्वे पोलीस स्टेशन परळी वैजनाथ, आरोपी क. २) संजय त्र्यंबक भेंडेकर वय ५३ वर्षे व्यवसाय पोलीस हवालदार ब.नं २१४ नेमणुक शासकीय रेल्वे पोलीस स्टेशन परळी वैजनाथ , आरोपी क. ३) प्रेमदास दयाराम पवार वय ३७ वर्षे व्यवसाय पोलीस शिपाई ब.नं ५६७ नेमणुक शासकीय रेल्वे पोलीस स्टेशन परळी वैजनाथ यांचे विरूध्द पो.स्टे. गंगाखेड येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया चालु आहे.

सदरची सापळा कार्यवाही मा.पोलीस अधिक्षक श्रीमती. कल्पना बारवकर,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परिक्षेत्र नांदेड वमा.अप्पर पोलीस अधिक्षक श्रीमती. अर्चना पाटील, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परिक्षेत्र नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक श्री. भरत केशवराव हुंबे, पोलीस निरीक्षक श्री.अमोल कडु,पोलीस निरीक्षक,पोना/अनिल कटारे,पोना/अनिरूध्द कुलकर्णी,पोना/शेख मुखीद, पोशि/सचिन धबडगे, मपोशि/सारीका टेहरे, मपोशि/सावित्री दंडवते , पोह/जहागीरदार, पोशि/चट्टे, चापोह/चौधरी,पोना/कदमअे.सी.बी.परभणी यांनी यशस्वी केलेली आहे.

परभणी जिल्हयातील नागरीकांनी लाचखोर भ्रष्टाचारी लोकसेवकां विरूध्द तक्रार देण्यासाठी अथवा भ्रष्टाचारा विरूध्द करण्यात येणा—या कारवाई बाबत अधिक माहीतीसाठी खालील दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी यांचेकडून केले आहे.

**दुरध्वनी क्रमांक 02452-220597**

**टोल फ्री क्रमांक 1064**

**Email ID - dyspacbparbhani@gmail.com**

श्रीमती. कल्पना बारवकर,,पोलीस अधिक्षक,ला. प्र. वि. नांदेड परिक्षेत्र नांदेड —8888841965
श्रीमती. अर्चना पाटील, अप्पर पोलीस अधिक्षक ला. प्र. वि. नांदेड परिक्षेत्र नांदेड —9665479333
श्री.भरत हुंबे, पोलीस उप अधिक्षक, ला. प्र. वि. परभणी —7021002110
श्री. अमोल कडु, पोलीस निरीक्षक, ला. प्र. वि. परभणी —8087072919

Scanned with CamScanner